**ग्राम विकास विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांच्या सुमारे ५०० भौतिक सेवापुस्तकांचे स्कॅनिंग व डिजिटायझेशन करिता प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत..**

## महाराष्ट्र शासन
## ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण-**२०२५**/प्र.क्र.**१०८**/आस्था-१३/ई-१४७२२५३
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१
दिनांक: - ५ जानेवारी,२०२६

**वाचा :-**

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२५/प्र.क्र.४५/मआस्था, दि.२०.१०.२०२५

२) नॅशनल इन्फोर्मेटिक्स सेंटर सर्विसिज़ इन्कोर्पोरेटेड (NICSI) यांचे दि.०९.०७.२०२५ रोजीचे पत्र

**प्रस्तावना :-**

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ येथील सामान्य प्रशासन विभागाच्या शासन परिपत्रकान्वये भौतिक सेवापुस्तके डिजिटल करण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या असून, सदर शासन परिपत्रकातील परिच्छेद क्र.४.२ नुसार मंत्रालयीन सर्व विभागातील अधिकारी/कर्मचारी यांची सेवापुस्तके स्कॅन करुन आहरण व संवितरण अधिका-याच्या लॉगईन मधून e-HRMS अपलोड करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार, ग्राम विकास विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्या सुमारे २०० भौतिक सेवापुस्तकांचे सदर शासन परिपत्रकातील परिशिष्ट क्र.३ मध्ये नमूद केलेल्या तांत्रिक तपशिलाप्रमाणे स्कॅनिंग व डिजिटायझेशन करण्याचे प्रस्तावित आहे.

**२.** उपरोक्त संदर्भ क्रमांक २ येथील दि.१९.०३.२०२१ रोजीच्या पत्रान्वये नॅशनल इन्फोर्मेटिक्स सेंटर सर्विसिज़ इन्कोर्पोरेटेड (NICSI) या केंद्र शासनाच्या संस्थेकडून निविदा प्रक्रियेद्वारे केंद्र/राज्य शासनाचे विभाग, PSU व इतर संस्था यांच्या कार्यालयातील अभिलेखांचे स्कॅनिंग व डिजिटायझेशन करण्यासाठी ०४ वर्षाकरिता सेवापुरवठादार संस्थांची नियुक्ती (Empanelled) केलेली असून, विविध प्रकारच्या स्कॅनिंग व डिजिटायझेशनच्या सेवांचे दर ठरविले आहेत. तसेच, उपरोक्त दि.०९.०७.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे सदर करारास दि.०८.०८.२०२६ पर्यंत अथवा पुढील निविदा प्रक्रिया अंतिम होईल, यापैकी जे लवकर होईल तोपर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

**३.** सबब, ग्राम विकास विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्या सुमारे २०० भौतिक सेवापुस्तकांचे स्कॅनिंग व डिजिटायझेशन, OCR (Optical Character Recognition) आणि अनुक्रमणिका तयार करणे (indexation) इत्यादीकरिता येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

ग्राम विकास विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्या सुमारे २०० भौतिक सेवापुस्तकांचे स्कॅनिंग व डिजिटायझेशन, OCR (Optical Character Recognition) आणि अनुक्रमणिका तयार करणे (indexation) इत्यादीकरिता येणाऱ्या अंदाजित रु.१,००,०००/- इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**२.** सदरचा खर्च, "मागणी क्र.एल-४, मुख्य लेखाशीर्ष ३४५१- सेक्रटरीएट आर्थिक सेवा -०९० सेक्रेटरीएट (०१)(०१) ग्रामविकास विभाग (३४५१००८२) १३ कार्यालयीन खर्च" या अर्थसंकल्पीय लेखशिर्षाखाली खर्ची घालण्यात यावा व सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

**३.** वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम (भाग-२), दिनांक १७.०४.२०१५ अन्वये, प्रस्तुत वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, १९७८, भाग पहिला, उपविभाग दोन मधील अनुक्रमांक २०-अ, नियम क्र.७३ व अनुक्रमांक २०-ब, नियम क्र. ७३ प्रशासकीय विभागाला प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारानुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**४.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून, त्याचा संकेतांक २०२६०१०५११३७१९९०२० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PALLAVI KISHOR KOLEKAR

Digitally signed by PALLAVI KISHOR KOLEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CO-OPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT, 2.5.4.20=ba35d79c9fe547ea6b606f742ced2d6ebfd2c68412e49f5edac040ea7952ed5d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E01062E9C78C4616D627A8CF0A5B109EDC1A71F9A6CD0F92B84DDFCFC6C858AC, cn=PALLAVI KISHOR KOLEKAR
Date: 2026.01.05 17:54:47 +05'30'

**(पल्लवी कोळेकर)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१) प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
२) महालेखापाल, महाराष्ट्र (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर,
३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (रोखशाखेमार्फत),
४) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
५) कक्ष अधिकारी (रोखशाखा), ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
६) निवड नस्ती/कार्यासन-१३.